## एक अनुभव

ठेवा विश्वास अथवा ठेवू नका
अनुभवाचे सांगतो बोल ऐका
मंचकी मी पहुडलो असताना
वाटे जखडलो हलता येईना ||१||

सुरू झाल्या अंगी असह्य वेदना
रडता गागता पूर नयनांना
चोंदले नाक झाला अवरुद्ध कंठ
दडे बसले कानी अडे ऊरी श्वास ||२||

अचानक साऱ्या वेदना संपल्या
असून नसल्या सारख्या त्या झाल्या
तान्हा मी झालो कान्हा समोर आला
माझ्यासंगे गाली तो हसू लागला ||३||

तोच घाबऱ्या पत्नीने हलविले
म्हणे बोलाविते वैद्या काय झाले
खुणेनेच परी तिला थांबविले
पुनः माझे अंग घामे चिंब झाले ||४||

माझ्या मागे हिचे काय वाटले
हिला की कान्हाला निवडावे झाले
कचाट्यात  असे मन अडकले
पुनरपि मला रडू कोसळले ||५||

माझ्या सवे यावं की येथे राहावं
हसे वदे कान्हा ते तूच ठरव
प्रकाशात निळ्या तो विरघळला
निर्णय घेण्यातच खेळ संपला ||६||

– नारायण
०८/१२/२३